**संभाजी पाटील -निलंगेकर**
**मंत्री**

कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार,
भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई 400 032.

*www.maharashtra.gov.in*

# संदेश

व्यवसाय सुलभीकरणाचे वारे सर्वत्र वाहत असतांना कारखान्यातील कामगारांची सुरक्षा व आरोग्य यांची जपवणुक करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. "Make in India" सोबतच "Safe in India while working" हे ही तितकेच किंबहुना त्यापेक्षाही अधिक महत्वाचे आहे.

कारखान्यातील कामगारांची सुरक्षा व आरोग्य ही एक महत्वाची बाब असुन, कारखान्यात अपघात घडूच नये याकरीता कारखानदार, कामगार, व्यवसायजन्य सुरक्षातज्ञ व औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभाग या सर्वांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे. कारखान्यात काम करतांना कामगारांनी नियमांचे व प्रमाणित काम करण्याची पद्धतीचा (Standard Operating Procedure) अवलंब केल्यास तसेच सुरक्षितपणे काम करण्याचे प्रशिक्षण कामगारांना दिल्यास निश्चितपणे कामाच्या ठिकाणाचे अपघात टाळणे शक्य होईल.

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या संकेतस्थळावर कारखान्यातील कामगारांच्या सुरक्षा व आरोग्याबाबत सर्व संबंधितांना आवश्यक असणारी माहिती उपलब्ध आहे. या माहितीचा उपयोग सर्व संबधितांना तसेच तळागाळातील कामगारांना होईल व कामाच्या ठिकाणी होणारे अपघात टाळण्यास याची निश्चितच मदत होईल अशी मला आशा आहे.

(संभाजी पाटील-निलंगेकर)

**कार्यालयीन पत्ता :** १०१, पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
**फोन नं. :** ०२२ २२८४३६२८ • **फॅक्स :** ०२२ २२८४३६६४ • **ई-मेल :** *min.labourandsd@maharashtra.gov.in*